स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत

अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी पूर्व सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधन विषय

आश्रम शाळांची विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा

संशोधन कालावधी

2013-2023

संशोधक

माणिक उत्तमराव बाभुळगावकर

एम. ए. बी.एड (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. भोसले मारोती वि.

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख संशोधन मार्गदर्शक)

कै. डॉ.शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय कळमनुरी
ता. कळमनुरी जि. हिंगोली

संशोधन केंद्र

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड

डिसेंबर :- 2024

आश्रम शाळांची विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा

संशोधन कालावधी

2013-2023

प्रस्तावना:-

भारत देश 1947 रोजी स्वतंत्र झाला. 26 जानेवारी 1950 मध्ये भारतीय राज्यघटनेनुसार राज्यकारभार चालवण्यास सुरुवात झाली, तेव्हा भारतात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते महाराष्ट्रात सुद्धा कोल्हापूर संस्थान सोडले तर इतर जिल्ह्यात शिक्षणाचे प्रमाण नगण्य होते. त्यामुळे त्याकाळच्या बॉम्बे सरकारने तत्कालीन महाराष्ट्रातील आदिवासी भटक्या विमुक्त जाती व जमाती अशा वंचित समाजातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 1952-1953 मध्ये राज्यात प्राथमिक आश्रम शाळा सुरू केल्या. 1952- 53 ते 1974 पर्यंत या शाळा शिक्षण विभागाकडून चालवल्या जात होत्या. त्यानंतर 1 एप्रिल 1975 मध्ये या शाळा शासनाच्या समाज कल्याण विभागाकडे मोफत चालवण्यास वर्ग केल्या गेल्या. त्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी ज्या शाळा होत्या त्यांचे नियंत्रण समाज कल्याण विभागाकडे देण्यात आले. त्यानंतर 2001 मध्ये भटक्या विमुक्त जाती व जमाती, इतर मागासवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्ग कल्याण संचालनालयाची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर आता 1 एप्रिल 2017 पासून विजाभज, इमाव व इमाप्र स्वतंत्र कल्याण विभाग स्थापन झाला. यास इतर मागास बहुजन कल्याण विभाग असे नामकरण करण्यात आले व त्याचे स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आले आहे. 2011 च्या जनगणनेनुसार असा अंदाज व्यक्त करण्यात येतो की विमुक्त जाती व भटक्या जमातीची लोकसंख्या 72 लाख आहे. त्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्या समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आज घडीला जवळपास प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा 980 आश्रम शाळा आहेत या

शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत विजाभजच्या आश्रम शाळेतून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय, उद्योग, शेती व सेवा अशा विविध क्षेत्रात काम करताना दिसून येतात. त्यामुळे विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजाचे आर्थिक आणि सामाजिक कल्याण झालेले दिसून येते. परिणामी या वंचित दुर्बल समाजाचा आर्थिक सामाजिक स्तर वाढून त्यांच्या राहणीमानात सुधारणा झालेली दिसून येते तर दुसऱ्या बाजूने या आश्रम शाळेच्या बाबतीत समाजात गैरसमज सुद्धा पसरलेले दिसून येतात. या आश्रम शाळा केवळ अनुदान लाटणे तसेच राजकीय पक्षाचे कार्यकर्ते जोपासण्यासाठी स्थापन झालेल्या आहेत. तेव्हा या दोन्ही सकारात्मक व नकारात्मक बाबींचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्रस्तुत संशोधन अभ्यास विषय निवडला आहे.

अभ्यास विषयाची निवड:-

महाराष्ट्रातील वंचित आणि दुर्बल घटकातील समाजातील लोकांना मुख्य विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्या समाजातील लोकांना मुलभूत आणि कौशल्य विषयी शिक्षण देणे गरजेचे आहे. ही गरज महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाने विजाभजच्या आश्रम शाळा काढून पूर्ण केलेली दिसून येते. या आश्रम शाळांनी खरेच समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक उन्नती साधली आहे काय? तसेच या आश्रम शाळांना प्रत्यक्षात कोणत्या अडचणी आहेत या आश्रम शाळेच्या विकासासाठी नवीन काही उपक्रम राबविणे गरजेचे आहे काय? यासाठी संशोधकाने प्रस्तुत अभ्यास विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:-

1) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रम शाळांमधून राबवल्या जाणा-या विविध शैक्षणिक उपक्रमांचा अभ्यास करणे.
2) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या शाळेत शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

3) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रम शाळेसमोरील विविध समस्या व आव्हानांचा अभ्यास करणे.
4) या आश्रम शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
5) या आश्रम शाळांना मिळणारे शासकीय अनुदान आणि शासकीय सोयी सुविधांचा अभ्यास करणे.

गृहितके:-

1) विजाभज आश्रम शाळातून शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावला आहे.
2) विजाभज आश्रम शाळेतील राबवण्यात येणा-या उपक्रमामुळे मुलांचा सर्वांगीण विकास झाला आहे.
3) विजाभज आश्रम शाळांना मिळणारे शासकीय अनुदान व सोयीसुविधा अपु-या आहेत.
4) विजाभज आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक विकासाबरोबरच क्रीडा विषयक प्रगती झाली आहे.
5) विजाभज आश्रम शाळेतील शिकणा-या विद्यार्थ्यांमध्ये अनुपस्थिती व गळतीचे प्रमाण अधिक आहे.
6) मुलांच्या निवासांच्या आणि सुरक्षेच्या संदर्भात अनेक त्रुटी आहेत.

संशोधन पद्धती:-

सदर विषयाचे संशोधन करत असताना नमुना निवड पद्धतीमध्ये यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करून नमुना निवड केली जाणार आहेत तर निवडलेल्या नमुन्या मार्फत माहिती गोळा करण्याची मुलाखत पद्धती, प्रश्नावली पद्धती, निरीक्षण पद्धती यांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच मिळालेल्या माहितीचे विश्लेषण ची स्क्वायर चाचणी, F

चाचणी, T चाचणी, निर्देशांक, सरासरी माध्य या सांख्यिकीय पद्धतीचा वापर आवश्यकतेनुसार करण्यात येणार आहे. सदरील संशोधनासाठी प्राथमिक साधनसामग्री व द्वितीय साधनसामग्री या दोन्हीचाही वापर करण्यात येणार आहे. प्राथमिक साधनसामग्री मध्ये स्वतः प्रश्नावली, अनुसूची व मुलाखती द्वारे उत्तर दात्यांकडून माहिती गोळा करण्यात येणार आहे. तर द्वितीय साधनसामग्री मध्ये शासनाचे विविध अहवाल समाज कल्याण विभागाचे विविध अहवाल विविध ग्रंथ मासिके इत्यादींचा वापर करण्यात येणार आहे संबंधित संशोधनासाठी हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा 20 आश्रम शाळेतून शिकून गेलेल्या प्रत्येक शाळेतून 30 नमुन्यांची निवड करण्यात येणार आहे त्यानुसार 30 x 20 = 600 नमुने निवडण्यात येणार आहेत.

संशोधनाची व्याप्ती:-

प्रस्तुत संशोधनासाठी विशेष संदर्भ म्हणून हिंगोली जिल्ह्याची निवड केलेली आहे कारण हा अभ्यास विषय महाराष्ट्राच्या पातळीवर फार मोठा आहे. संशोधनाचा वेळ आणि खर्च विचारात घेता प्रस्तुत संशोधन विषयाचे क्षेत्र एका जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधन हे 2013 ते 2023 या कालावधीसाठी करण्यात येणार आहे.

प्रकरणाची रूपरेषा:-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्रकरणाची मांडणी खालील प्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रकरण 1 ले प्रस्तावना:-

महाराष्ट्रातील विविध आश्रम शाळा आणि आश्रम शाळांना मिळणा-या विविध शासकीय योजना व अनुदान यांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 2 रे संदर्भ साहित्याचा आढावा:-

या प्रकरणांमध्ये संशोधन विषयाशी संबंधित असलेले विविध संशोधन लेख,ग्रंथ यांचा योग्य तो आढावा घेण्यात येईल. एम फिल व पीएचडी चे शोधप्रबंध यांचा योग्य तो आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 3 रे हिंगोली जिल्हयाची पार्श्वभूमी:-

प्रस्तुत संशोधनामध्ये या तिस-या प्रकरणात हिंगोली जिल्हयाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय,भौगोलिक,लोकसंख्या विषयक पार्श्वभूमी यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 4 थे आश्रम शाळेतील शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांची सद्यस्थिती:-

प्रस्तुत प्रकरणात हिंगोली जिल्हयातील विविध आश्रम शाळातून विद्यार्थ्यांसाठी राबवल्या जाणा-या विविध उपक्रमांचा अभ्यास करण्यात येणार आहे तसेच या प्रकरणात सध्या स्थितीत हिंगोली जिल्हयात या आश्रम शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा संख्येचा, विद्यार्थ्यांच्या अनुपस्थिती व गळतीच्या प्रमाणाचा अभ्यास, त्यांना शिकवणा-या शिक्षकांच्या कार्याचा आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या संख्येचा अभ्यास करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्हयाच्या आश्रम शाळांना मिळणा-या शासकीय अनुदान व शासकीय सुविधांचा अभ्यास करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना मिळणा-या निवासाच्या संदर्भात असणा-या सुविधा, क्रीडाविषयक सुविधा, बौद्धिक वाढीसाठी राबविण्यात येणा-या सुविधा, भोजन विषयक सुविधा, आरोग्य विषयक सोयी सुविधा, सुरक्षा विषयक सुविधा, स्वच्छ पाणी विषयक सुविधा, स्वच्छता विषयक सुविधा इत्यादींचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 5 वे आश्रम शाळेतील माजी विद्यार्थ्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती:-

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाला अनुसरून आश्रम शाळेतून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. आश्रम

शाळेत शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये व सामाजिक स्तरांमध्ये काय बदल झाले याचा मागोवा घेण्यात येणार आहे.

प्रकरण 6 वे निष्कर्ष व शिफारशी:-

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाला अनुसरून अभ्यासाअंती आलेली निष्कर्ष मांडण्यात येतील व त्या निष्कर्षाला अनुसरून काही शिफारशी सुचविण्यात येतील.

संदर्भसूची:-

1) डॉ. प्रबोधनकार, प्रा आलोणी व कुलकर्णी-सामाजिक संशोधन पद्धती-श्री साईनाथ प्रकाशन- जानेवारी 2018
2) प्रदीप आगलावे - सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे-साईनाथ प्रकाशन
3) आश्रमशाळा संहिता
4) समाज कल्याण विभागाचे विविध मासिके व अहवाल
5) लोकराज्य मासिक
6) महाराष्ट्रातील भटके- विमुक्त सद्यस्थिती आणि आव्हाने- संपादन- डॉ. अनिल सपकाळ डॉ. नारायण भोसले
7) विमुक्त भटक्यांचे स्वातंत्र्य?- लक्ष्मण गायकवाड

संशोधक

मार्गदर्शक

माणिक उत्तमराव बाभुळगावकर

डॉ. भोसले मारोती वि.

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख संशोधन मार्गदर्शक)

कै.डॉ.शंकरराव सातव कला व वाणिज्य

महाविद्यालय

कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली